

# नाडी भविष्यानी केला अंनिसचा पराभव

# अर्थात बोध अंधश्रद्धेचा

## प्रस्तावना  E Book 191





**विंग कमांडर शशिकांत ओक**
जन्म : ३१ जुलै ४९, पुणे.
हवाईदलात वरिष्ठ लेखा अधिकारी म्हणून गेली २७ वर्षे कार्यरत. सांस्कृतिक कार्यक्रम, नाटके यात सहभाग. सामान्य ज्ञान, कला-क्रीडा भाषांवर आधारित मराठी, हिंदी नियतकालिकामधून विविध कोडी प्रकाशित. अंधार छाया नावाची कादंबरी मराठीत प्रकाशित. 'नाडी भविष्य' विषयावर विविध चर्चा, भाषणे, लेख व शोध कार्य.

❑ "**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती** ही एक '**सर्कस**' आहे. आपण (दाभोळकर) या सर्कसचे रिंग मास्टर असल्याने " माझ्या रिंगणांत या, मग मी तुम्हाला कसा लोळवतो पहा" असा आपला पवित्रा तुमच्या दृष्टीने **शास्त्रीय** पायावर आधारित पण भविष्य काळांत कसेही करून अंग काढून पसार होण्यास सोईचा आहे. तथापि या इथे नाडी भविष्य कर्ते **महर्षी हे 'रिंग मास्टर'** आहेत ! भविष्याच्या आसूडाला तो "थोतांड" म्हणून आव्हान देऊन आपण रिंगणात उतरला आहात ! वर्तमान पत्रांतून परिपत्रके व लेख लिहून, मला मधे घालून, " पहा या **रिंग मास्टरची कशी ऐशी की तैशी करतो" नाहीतर ५ लाख देतो"** असे डरकाळ्या फोडणारे आवाज आपण वेळोवेळी **सातान्यात बसून** काढता ! मात्र **मद्रास भागातील नाडी केंद्रास भेटी देण्याचे नाव काढीत नाही.** कारण तेथे जाऊन पराजित झाल्यामुळे अं.नि.स. ला व पर्यायाने आपल्याला **तोंड काळे करून घ्यायचे नाही !**... आपल्या 'अंनिस सर्कस' चालायचे दिवस आता फार जिकारीचे झाले आहेत. प्रवीण कसरत पटू शिष्यगण आपणांस सोडून गेलेले आहेत. इतर शिलेदारांनाही आपल्या आसूडाचा बेगडीपणा लक्षांत आला आहे. वर्तमान पत्र वाले एकजात आपल्या विविध कृत्यांना आपल्यामागे कुत्सितपणे हसून नावे ठेवतात. मात्र **तोंडावर व वर्तमानपत्रांतून नावे ठेवायला आपल्या सर्कसचा दरारा मोठा असल्याने टाळतात. पण जे आपल्या कल्पना विश्वात तल्लीन असतात अशा आपणांस हे लक्षात आलेले नाही...**

❑ "...नाडी भविष्या बाबत आपल्या समितीचे **मद्रासला 'पानिपत (वॉटर्लू)** होणार हे ओळखून आपण तिकडे गेला नाहीत तरी न जाताच **स्वतःच्या घरी (महाराष्ट्रात) न जाण्यानेच** तिचे पानिपत झाले. समितीचा **मुकुट** येथेच **धुळीस मिळाला आहे."** ..

❑ "... अपरोक्ष वाद घालण्यापेक्षा पुण्या मुंबईत, उभयतांच्या सवडीने, केव्हांही, एका व्यासपीठावर वाद संवाद करायला ओक तयार आहेत. मात्र त्या आधी **दाभोळकर व नारळीकरांनी स्वतःच्या व अन्य १० जणांच्या संदर्भात नाडी भविष्याची शास्त्रीय कसोटी मद्रासला जाऊन ओकांच्या उपस्थितीत करून घ्यावी लागेल.** अशी अट या साठी की त्यांच्या उपस्थिती शिवाय, कसोटी न करता केलीली **चर्चा निरर्थक होईल...** "**सवंग जाहिरात करण्यासाठी केलेली कुठलीही कृती अं.नि.स. चा बेगडीपणा निर्णायकपणे उघडकीस आणेल...**"

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने नाडी भविष्या विषयी निर्माण केलेला अपप्रचार आणि त्यांना दिले गेलेल्या सणसणीत उत्तरांचे संकलन

संकलक- विंग कमांडर शशिकांत ओक

# 'अंनिस सर्कस'




**"महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही एक 'सर्कस' आहे. आपण (दाभोळकर) या सर्कसचे रिंग मास्टर असल्यानें" माझ्या रिंगणांत या, मग मी तुम्हाला कसा लोळवतो पहा" असा आपला पवित्रा तुमच्या दृष्टीनें शास्त्रीय पायावर आधारित पण भविष्य काळांत कसेही करून अंग काढून पसार होण्यास सोईचा आहे. तथापि या इथे नाडी भविष्य कर्ते, महर्षी हे 'रिंग मास्टर' आहेत !** भविष्याच्या आसूडाला तो "थोतांड" म्हणून आव्हान देऊन आपण रिंगणात उतरला आहात ! वर्तमान पत्रांतून परिपत्रके व लेख लिहून, मला मधे बालून, " "पहा या रिंग मास्टरची कशी ऐशी की तैशी करतो" नाहीतर ५ लाख देतो" असे डरकाळ्या फोडणारे आवाज आपण वेळोवेळी साताऱ्यात बसून काढता ! मात्र मद्रास भागातील नाडी केंद्रास भेटी देण्याचे नाव काढीत नाही. कारण तेथे जाऊन पराजित झाल्यामुळे अं.नि.स. ला व पर्यायाने आपल्याला तोंड काळे करून घ्यायचे नाही !... आपल्या 'अंनिस सर्कस'

चालायचे दिवस आता फार जिकारीचे झाले आहेत. प्रवीण कसरत पटू शिष्यगण आपणांस सोडून गेलेले आहेत. इतर शिलेदारांनाही आपल्या आसूडाचा बेगडीपणा लक्षांत आला आहे. वर्तमान पत्र वाले एकजात आपल्या विविध कृत्यांना आपल्यामागे कुत्सितपणे हसून नावे ठेवतात. मात्र तोंडावर व वर्तमानपत्रांतून नावे' ठेवायला आपल्या सर्कसचा दरारा मोठा असल्याने टाळतात. पण जे आपल्या कल्पना विश्वात तल्लीन असतात अशा आपणांस हे लक्षात आलेले नाही...

**"...नाडी भविष्या बाबत आपल्या समितीचे मद्रासला 'पानिपत (वॉट) होणार, हे ओळखून आपण तिकडे गेला नाहीत तरी न जाताच स्वतःच्या घरी (महाराष्ट्रात) न जाण्यानेच तिचे पानिपत झाले. समितीचा मुकुट येथेच धुळीस मिळाला आहे."..**

अपरोक्ष वाद घालण्यापेक्षा पुण्या मुंबईत, उभयतांच्या सवडीने, केव्हांही, एका

व्यासपीठावर वाद संवाद करायला ओक तयार आहेत. मात्र त्या आधी दाभोळकर व नारळीकरांनी स्वतःच्या व अन्य १० जणांच्या संदर्भात नाडी भविष्याची शास्त्रीय कसोटी मद्रासला जाऊन ओकांच्या उपस्थितीत करून घ्यावी लागेल. अशी अट या साठी की त्यांच्या उपस्थिती शिवाय, कसोटी न करता केलीली चर्चा निरर्थक होईल...

" सवंग जाहिरात करण्यासाठी केलेली कुठलीही कृती अं. नि.स. चा बेगडीपणा निर्णायकपणे उघडकीस आणेल..."

----------------------------------------------

# प्रस्तावना



प्रा. अद्वयानंद गळतगे.

'बोध अंधश्रद्धेचा' हे पुस्तक विंग कमांडर शशिकांत ओक यांना लिहून प्रकाशित करण्याची प्रेरणा झाली ती महाराष्ट्र अंधश्रद्धानिर्मूलन समितीने नाडी भविष्याविषयी स्वीकारलेल्या धोरणामुळे ! आणि ते एवढ्या पोटतिडकीने या विषयावर लिहितात ते त्यांना नाडीविषयी आलेल्या 'चक्रावून सोडणाऱ्या' अनुभवामुळे! या बाबतीत त्यांच्या व माझ्या अनुभवात बरेच साम्य आढळून येते.

ज्यावेळी अंधश्रद्धानिर्मूलन हा शब्दप्रयोग मराठी भाषेत रूढ नव्हता त्या वेळची ही गोष्ट आहे. प्रस्तुत लेखक त्यावेळी कट्टर बुद्धिवादी होता. विज्ञानाने शोधून काढलेल्या नियमाविरूद्ध कोणतीही घटना घडणे शक्य नाही याची त्याला शंभर टक्के खात्री असल्यामुळे कोणी एखादी अशी घटना घडल्याचे सांगितले तर तो ताबडतोब त्या घटनेची सांगितलेल्या ठिकाणी जाऊन जातीने तपासणी करीत असे. एकदा एका नात्यातील माणसाने लेखकाला सांगितले की बेळगांवच्या दक्षिणेला काही मैल अंतरावर असलेल्या यल्लूर या गावी एक लिंगायत स्वामी असून तो भूत-भविष्य अचूकपणे सांगतो. हे ऐकताच मी त्याची परीक्षा घेण्याचे ठरवून योग्य संधी येताच त्याच्याकडे गेलो.

मी त्याच्या समोर जाऊन बसलो नाही तोच तो मला (कानडीत) म्हणाला, "साहेब, तुम्ही माझी परीक्षा घेण्यासाठी आला आहात हे खरे. पण मी कुणाला परीक्षा देण्यासाठी येथे बसलेलो नाही. लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी बसलो आहे," हे ऐकून मी सर्दच झालो ! माझ्या वैज्ञानिक अभिमानाला ही

सलामीलाच चपराक होती ! मी हे खरे असल्याचे मान्य केले. तथापि एका चोरीच्या प्रकरणाबद्दल विचारयाचे आहे, म्हणून आलो आहे, असे मी म्हटले. मग त्याने आपल्या हातातील नोटपेंड माझ्या समोर धरले, त्यावर त्याने हातातील नोटपेंडवर काहीतरी लिहिले, व मला कोणत्याही एका फुलाचे नाव मनात धरायला सांगितले. मी 'धरले' असे म्हणताच त्याने मी मनात धरलेल्या फुलाचे नांव लिहिले होते! आणि तेही मी मनात धरण्यापूर्वीच. म्हणजे मी कोणते फूल मनात धरणार आहे हे त्याने अगोदरच ओळखले होते. ते ओळखल्याचा पुरावाच माझ्यासमोर धरला होता ! माझ्या वैज्ञानिक दृष्टीला दिलेला हा दुसरा धक्का होता. नंतर तो म्हणाला, "साहेब, तुमचे ६४ रुपये चोरीला गेले आहेत." हेही बरोबर होते! चोरणाऱ्या माणसाचे वर्णनही त्याने केले. ते मला पटले. पैसे मिळणार नाहीत असे त्याने सांगितले. ते भाकीतही खरे ठरले. आणखी काही मी विचारलेल्या प्रश्नांना त्याने समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर मी त्याचा निरोप घेण्यासाठी उठणार तोच तो मला म्हणाला, 'साहेब, तुम्ही एका मोठ्या व्यक्तीच्या मदतीने पुढे कॉलेज काढणार आहात.' हे ऐकून मात्र मी स्तंभितच झालो ! त्या वेळी मी एक साधा हायस्कूल शिक्षक होतो. कॉलेजमध्ये प्राध्यापक होण्याचेही स्वप्न नव्हते. मग कॉलेज काढण्याची गोष्ट दूर ! मी मनातल्या मनात हसलो व त्याचा निरोप घेतला. पण खरोखरच त्याचे हे भाकीत नंतर खरे ठरले ! वीस वर्षांनंतर मी खरोखरच एक ज्युनियर कॉलेज काढले. आणि तेही कोणा सामान्य व्यक्तीच्या साह्याने नव्हे, तर खुद्द भारताच्या (माजी) पंतप्रधानांच्या मदतीने ! अर्थात् त्यावेळी ते पंतप्रधान नव्हते, तर कर्नाटकांत नुकतेच सत्तेवर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारात एक मंत्री होते- देवेगौडा ! आश्चर्य म्हणजे हे भविष्य त्या स्वामीनी माझे नाव, जन्म तारीख वगैरे काही माहीत नसताना वर्तविले होते !

मी डॉ. नारळीकरांना मद्रासला जाऊन नाडीग्रंथाची जातीने तपासणी करण्याचा लागोपाठ पाच पत्रे लिहून आग्रह धरला आहे तो याच कारणासाठी. (ही पांच पत्रे या ग्रंथात समाविष्ट केली आहेत.) मात्र या पांच पत्रांपैकी फक्त पहिल्या पत्राला त्यांनी उत्तर दिले आहे. त्यांत ते म्हणतात की माझ्या व त्यांच्या विज्ञानविषयक दृष्टिकोणामध्ये महदंतर आहे. महत् राहू द्या कोणते अंतर आहे

याची पुसट कल्पना तरी त्यांनी मला द्यावी की नाही ? पण ती देण्याइतकी त्यांच्या दृष्टीने माझ्यात वैज्ञानिक पात्रता नसावी? मात्र श्री. शशिकांत ओक यांना लिहिलेल्या पत्रोत्तरात ते म्हणतात की हजार दोन हजार व्यक्तींचे सैंपल घेऊन नाडीग्रंथातील भविष्याची तपासणी करावी लागेल ! इतक्या मोठ्या सैपलशिवाय नाडीग्रंथांचा पडताळा येत नसेल तर या ग्रंथाकडे कोण कशाला फिरकले असते ? आणि हे ग्रंथ तरी एवढे प्रसिद्ध कसे झाले असते? बरे, यात काही लबाडी असेल तर ती नारळीकरांसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शास्त्रज्ञाने उघड करण्याचे व भारतात बोकाळलेल्या या अंधश्रद्धेला कायमची मूठमाती देण्याचे श्रेय का मिळवू नये ? The taste of the pudding lies in its eating (एखाद्या खिरीची चव ती खाल्ल्याशिवाय कळत नाही) अशी इंग्रजीत म्हण आहे. नारळीकर मात्र प्रयोगशाळेत 'हजार-दोन हजार सॅपल' घेऊन त्या खिरीची चव ठरवणार !

काही जण नाडीकडे जाणाऱ्या व्यक्तींचे भविष्य लिहिण्यासाठी किती लोकांना किती काळ लिहित बसावे लागेल व अशा ग्रंथांची संख्या किती होईल यांची आकडेमोड करून हे कसे अशक्य आहे हे दाखवून देण्यांत आपली सारी बुद्धिमता वेचली आहे ! त्यांचा हा खटाटोप पाहून मला रामकृष्णांची एक गोष्ट आठवली. ते एका माणसाला आजन्म ब्रह्मचर्य पाळणे आध्यात्मिक जीवनासाठी कसे आवश्यक आहे हे एकदा सांगत होते. जवळच बसलेला दुसरा माणूस हे ऐकून रामकृष्णांना म्हणाला, 'पण महाराज, हे अशक्य आहे, तुमच्या शिकवणीप्रमाणे वागायचे ठरविल्यास हे जग कसे चालेल? या जगात माणसे कोठून येतील?" यावर रामकृष्ण त्या माणसाला म्हणाले, 'महाशय, ब्रह्मचर्याची गरज मी यांना सांगत आहे. तुम्हाला नाही!" नाडीग्रंथांच्या संख्येचा विचार करून नाडीभविष्याचा खोटेपणा (किंवा अशक्यपणा) सिद्ध करू पाहणाऱ्या या लोकांना उद्देशून ओक (किंवा नाडीवाले) म्हणू शकतील की "नैषःतेषां प्रति यत्नः!" (महाशय, नाडी भविष्य हा तुमचा विषय नव्हे !)

अंधश्रद्धानिर्मूलन समितीच्या लोकांविषयी तर बोलायलाच नको. महाराष्ट्रातच नव्हे तर त्यांच्या स्वतःच्या शहरात त्यांना एका ज्योतिष्याने आव्हान स्वीकारले असतां त्यानी आयत्या वेळी रणांगणांतून पळ काढला आहे ! (पहा: 'ज्योतिषशास्त्राच्या आव्हानप्रक्रियेतून अंधश्रद्धानिर्मूलनवाद्यांचे पलाजन' पैलतीर,

१९९३, किंवा विज्ञान, बुद्धिवाद आणि चमत्कार हा लेखकाचा आगामी ग्रंथ). तेव्हा हे लोक नाडीग्रंथांचा मद्रासला जाऊन पाठपुरावा करतील ही आशा बाळगणे व्यर्थ आहे. यांच्याच पैकी एका लेखकाने नाडीची स्वतःतपासणी न करता तिला 'फसवणुकीचा धंदा' ठरवले आहे ! आत्मानंद यांच्या 'अमृत तुषार' या ग्रंथाचा हवाला देऊन हा लेखक म्हणतो की ३० वर्षापूर्वीच या आध्यात्मिक साधकाने नाडीला आव्हान दिले होते. ('साप्ताहिक सकाळ' १३ जुलै १९९६. आत्मानंदांच्या 'अमृत तुषार' या ग्रंथाला हा लेखक 'अमृत सर' म्हणतो!) 'अंनिस' ची तळी उचलून धरणाऱ्या या लेखकाला आत्मानंदांच्या 'आज्ञाताचा शोध आणि बोध' या दुसऱ्या ग्रंथाची माहिती नसावी! या ग्रंथांतील 'भविष्यकालीन घटना व त्यांचे ज्ञान' या प्रकरणात ज्यांची भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरली आहे अशा अनेक अतींद्रिय दृष्टिच्या व्यक्तींची आत्मानंदानी उदाहरणे दिली आहेत. नाडीबाबत आत्मानंदांच्या 'अमृत तुषार' या ग्रंथाचा हवाला देणारे 'अंनिस' वाले वरील त्यांच्या दुसऱ्या ग्रंथाचा हवाला देऊन त्यानी त्या ग्रंथात सिद्ध केलेली भविष्यविषयक मानवातील अतींद्रिय शक्ती मान्य करायला तयार आहेत काय ? नसतील तर त्यांनी आत्मानंदांच्या (किंवा इतर कोणाच्याही) ग्रंथाचा हवाला देऊन आपले नाडी विषयक मत व्यक्त करू नये, तर स्वतःतटस्थ निरीक्षकांसमोर त्या ग्रंथांची तपासणी करावी व नंतरच तिला 'फसवणुकीचा धंदा' ठरवावे. जोपर्यंत 'अंनिस' नाडीची सार्वजनिकरीत्या तपासणी करण्यास पुढाकार घेत नाही तोपर्यंत 'पलायनवादा' च्या आरोपातून तिला मुक्त होता येणार नाही.

डॉ. नारळीकरांनी हजारो व्यक्तींच्या सॅपलची गरज आहे हे निमित्त करून हे नाडी प्रकरण हातचे झटकून टाकण्यामागचे खरे कारण मात्र विज्ञानवाद हे नसून त्यांचा 'बुद्धिवाद' हे आहे ! पण जातीचा वैज्ञानिक कधीच बुद्धिवादी असू शकत नाही. याला भौतशास्त्रांचा कॉंटम सिद्धांतच साक्षी आहे. पण कॉंटम सिद्धांताची साक्ष काढण्याची गरज नाही, इतिहासाची साक्ष त्यासाठी पुरेशी आहे. माझ्या नारळीकरांना लिहिलेल्या पत्रात मी गॅलीलिओचा दाखला दिला आहे तो याच साठी. गॅलीलिओने आपल्या बुद्धिवादी विरोधकांना आपल्या नव्या 'काचे' तून (दुर्बिणीतून) पाहण्याचे वरचेवर पाचारण करूनही ते त्यातून पाहायला

कधीच तयार झाले नाहीत, याचे कारण चंद्राला खड्डे असणे, किंवा गुरूला चंद्र असणे शक्यच नाही असे त्यांचा बुद्धिवाद त्यांना सांगत होता! हल्ली नारळीकरांचा हजारो व्यक्तींच्या सॅपलचा युक्तिवाद हेच सांगत आहे! म्हणजे या नाडी प्रकरणात नारळीकर गॅलीलिओची भूमिका बजावत नसून त्याच्या बुद्धिवादी विरोधकांची भूमिका बजावत आहेत ! आणि हीच वैज्ञानिक दृष्टी बाळगण्याऱ्यांची खरी व्यथा आहे.

एके काळी नारळीकरांप्रमाणेच मीसुद्धा विज्ञानाच्या नांवाखाली बुद्धिवादांचा टेंभा मिरवत होतो. हा बुद्धिवाद मी देव-धर्म न मानणाऱ्या प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ ज्युलियन हक्सले यांच्यापासून उचलला होता. त्याच्याप्रमाणेच मीही मानवातील देव-धर्माविषयक कल्पनांची उपपत्ती उत्क्रांतिवादी दृष्टिकोनातून, म्हणजे नैसर्गिक विज्ञानाची (Natural Science) कास धरून देता येते असे मानत होतो. पुढे त्याचा Evolution: Modern Synthesis हा ग्रंथ माझ्या वाचनात आला. या ग्रंथाच्या शेवटी हक्सलेने जे. बी. हाईन या जीवशास्त्रज्ञाच्या Extrasensory Perception या ग्रंथाचा हवाला देऊन म्हटले आहे की मानवात अतींद्रिय शक्ती आहे आणि या शक्तीच्या खरेपणाचा ड्यूक युनिव्हर्सिटीच्या प्रयोगशाळेत ऱ्हाईनने केलेल्या प्रयोगांच्या आधारे त्याने निर्वाळा दिला आहे! अतींद्रिय शक्तीचे अस्तित्व पाश्चात्य शास्त्रज्ञांनी वैज्ञानिक निकषाखाली सिद्ध केल्याचे हा ग्रंथ वाचेपर्यंत मला माहीतच नव्हते! नंतर मी हाईन व इतर शास्त्रज्ञांच्या या विषयावरील संशोधनाची माहिती अनेक ग्रंथातून मिळविली व मला माझा बुद्धिवाद किती तोकडा आहे याची कल्पना आली.

मानवात भविष्यात घडणाऱ्या घटना जाणण्याची शक्ती आहे हे नियंत्रित परिस्थितीत वैज्ञानिक निकषाखाली सिद्ध झाले आहे हेच ज्यांना माहीत नाही (किंवा मान्य नाही) ते लोकच या शक्तीच्या खरेपणाविषयी नेहमी वाद घालताना दिसतात. पण ही अतींद्रिय शक्ती असलेल्या काही प्रसिद्ध व्यक्तीनी जगातील काही गाजलेल्या घटनांचे अगोदरच सार्वजनिकरीत्या भाकीत केले होते व नंतर ते खरे ठरले ही वस्तुस्थिती ते नाकारू शकणार नाहीत. अशा प्रमाणभूत (documented) भाकितांच्या घटनांची प्रसिद्ध उदाहरणे म्हणजे महात्मा गांधींची हत्या, केनेडी बंधूची हत्या, मार्टिन ल्यूथर किंगची हत्या, इंदिरा

गांधीची हत्या, पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध, भारताची फाळणी, ब्रिटीश विमानवाहतुकीतील सर्वात मोठी दुर्घटना, अमेरिकन विमान वाहतुकीतील सर्वात मोठा अपघात जगातील मोठ्या टिटॅनिक नावाच्या जहाजाला झालेला अपघात व त्यात त्याला मिळालेली जलसमाधी, केप केनडी येथील अपोलो सहा या कॅप्सूलला आग लागून त्यात तीन अंतराळ यात्रींचा झालेला मृत्यू इ. (अब्राहाम लिंकन यांना हत्येपूर्वी त्यांच्या स्वतःच्या प्रेतयात्रेचे स्वप्न पडले होते !) या शिवाय भावी घटनांची जागेपणी वा स्वप्नात अनेकांना दृश्ये जशीच्या तशी दिसतात. अशा प्रकारचे अनुभव सामान्य लोकानाही येतात, व ते तपशीलासह खरे ठरतात. या विषयीची माहिती जिज्ञासूंना सी. एन्. गॅटी या लेखकाच्या Prophesy and Prediction in the 20th Century या ग्रंथात संदर्भासह वाचावयास मिळेल.

जे. बी. ऱ्हाईन यांनी मानवातील अतींद्रिय शक्तीचे अस्तित्व प्रयोगशाळेत वैज्ञानिक निकषाखाली व नियंत्रित परिस्थितीत सिद्ध केले आहे तर त्याच्या पत्नीने, लुइसा ऱ्हाईनने, दररोजच्या जीवनात उत्स्फूर्तपणे (spontaneous) अतींद्रिय अनुभव येणाऱ्या हजारो व्यक्तींची अनेक वर्षेपर्यंत आकडेवारी गोळा करून या शक्तीचे समाजातील अस्तित्व आपण समजतो त्यापेक्षा कितीतरी जास्त व व्यापक असल्याचे दाखवून दिले आहे. (ESP in Life and Lab, 1967, The Invisible Picture, 1981.) सामान्य माणसांना येणाऱ्या अतींद्रिय अनुभवांपैकी ४० टक्के अनुभव भविष्यसूचक असतात; या भविष्यसूचक अनुभवांपैकी ७५ टक्के अनुभव भविष्यसूचक स्वप्नांचे व बाकीचे जागेपणीचे असतात, असे त्यांना आढळून आले आहे. वर उल्लेख केलेल्या जागतिक घटनांपैकी मोठ्या अपघातांची स्वप्ने अनेक सामान्य माणसांनाही पडली होती असे आढळून आले आहे. एका व्यक्तीला तर अमेरिकेच्या सर्वात मोठ्या विमान अपघाताचे एकच स्वप्न लागोपाठ दहा रात्री न चुकता पडले होते !

An Experiment With Time या ग्रंथात जे. डब्ल्यू. डन या लेखकाने आपल्या खऱ्या होणाऱ्या अनेक स्वप्नांची उदाहरणे दिली आहेत.

आता ही स्वप्ने खरी ठरली यावर इतरांनी कसा विश्वास ठेवायचा? अशी

स्वप्ने त्यांचा पडताळा पाहण्यासाठी अगोदर कळवावीत म्हणून लंडन व न्यूयॉर्क Premoni- tion Centres येथे स्थापन केली आहेत. त्यावरून ती खरी ठरतात हे स्वतंत्रपणे सिद्ध झाले आहे. शिवाय मौटग्यू उलमन आणि स्टानली क्रिपनर या शास्त्रज्ञांनी अमेरिकेंत ब्रुकलिन येथे 'ड्रीम लॅबोरेटरी ऑफ मायमोनाइड्स् मेडिकल सेंटर' ही स्वप्नावर प्रयोग करणारी संस्था स्थापून भविष्यसूचक स्वप्नांचा नियंत्रित परिस्थितीखाली प्रायोगिक पडताळाही पाहिला आहे. ? (REM रॅपिड आय मूव्हमेंट या पद्धतीने ही तपासणी करता येते.) तेव्हा भविष्यसूचक स्वप्नांचा खरेपणा आता शास्त्रीय निकषाखाली सिद्ध झाला असल्याने या पद्धतीने मानवाला भविष्याचे अतींद्रिय ज्ञान होते हे आता कोणालाही नाकारता येणार नाही.

मानवाच्या या अर्तींद्रिय शक्तीविषयी बुद्धिवादी नेहमी एक असा आक्षेप घेतात की फक्त खरी ठरणारी भाकीतेच प्रसिद्ध करण्यात येतात; खोटी ठरणारी भाकीते प्रसिद्ध केली जात नाहीत. पण काही भाकीते खोटी ठरतात म्हणून खरी ठरणाऱ्या भाकीतांची उपपत्ती देण्याची जरूरी असे ठरते काय? प्रश्न आहे तो जी भाकीते खरी ठरली ती योगायोगाने ठरली असे बुद्धिवादी म्हणू शकतात काय हा. जे. बी. हाईन यांनी योगायोगाला थारा मिळू नये म्हणूनच प्रयोग शाळेत खास शास्त्रीय निकष ठरवून या शक्तीची परीक्षा घेतली आहे व तिचे खरेपण संख्याशास्त्राच्या आधारे सिद्ध केले आहे. अशारीतीने बुद्धिवाद्यांचा हा आक्षेप शास्त्रीय निकषावरच निकालात काढण्यात आला आहे.

काही विज्ञानवादी मात्र तात्विक भूमिकेवरून मानवाला भविष्यज्ञान होणे शक्य नाही असे प्रतिपादतात. त्यांचे म्हणणे असे की कोणत्याही वस्तूचे वा घटनेचे मानवी मेंदूवर परिणाम झाल्याखेरीज तिचे वा त्याचे मानवी मेंदूला ज्ञान होणार नाही. भविष्यकथन म्हणजे अस्तित्वात नसलेली वस्तू वा घटना सांगणे. आता अस्तित्व नसलेल्या वस्तूचे वा घटनेचे मानवी मेंदूवर कसे परिणाम होतील? पण भविष्य खरे ठरते ही वस्तुस्थितीच सांगते की असे परिणाम होऊ शकतात ! मानवी मेंदू म्हणजेच मन नव्हे हे यावरून सिद्ध होते व या शास्त्रज्ञांचा मानवी मनाचा भौतिकवादी सिद्धांत (Materialistic theory of mind) कोलमोडून पडतो ! पेनफील्ड, एकलस या सारख्या मेंदू व मज्जाशास्त्रज्ञांच्या संशोधनानेंही

सिद्ध झाली आहे कीं, मानवी मनाला जडवादी निकष लावणे चुकीचे असून मानवी मेंदू म्हणजेच मानवी मन नव्हे. मानवी मनाला अतींद्रिय नावाचे पुरावे नाकारून जडवादी निकष लावणाऱ्या या शास्त्रज्ञाना या आयसेक मानसशास्त्रज्ञाने म्हणूनच pigheaded (आडमुठे) म्हटले आहे !

पण हे सोडून द्या. खुद्द भौतिक शास्त्रातील संशोधन काय सांगते? आईन्स्टाइनच्या सापेक्षता सिद्धांतानुसार भौतिक विश्वात प्रकाशापेक्षा जास्त वेग अस्तित्वात नाही. प्रकाशकणाला 'फोटॉन' म्हणतात, व तो सेंकदाला तीन लक्ष कि. मी. वेगाने जातो, अशी कल्पना करा की मानवी मन या प्रकाशाच्या वेगाने प्रवास करीत आहे, किंवा एखादी व्यक्ती फोटॉनवर आरूढ झाली आहे. (आईन्स्टाइनने अशी कल्पना करूनच सापेक्षता सिद्धांत मांडला होता.) सापेक्षता सिद्धांतानुसार अशा (प्रकाशकणावरील) व्यक्तीच्या दृष्टीने काळ स्थिर (static) बनेल ! म्हणजे त्या व्यक्तीच्या लेखी भूत, वर्तमान, भविष्य हा भेद तत्काळ नाहीसा होईल! सर्वच वर्तमान बनेल. आणि भविष्य जाणणाऱ्याला सर्व 'वर्तमानच' असते. म्हणूनच त्याला सर्व घटना 'प्रत्यक्ष' दिसतात. अशारीतीने अतींद्रिय भविष्यज्ञानाला सापेक्षता सिद्धांताचा तात्विक (आणि गणितीही!) पाठिंबा मिळतो ! (म्हणूनच आईन्स्टाइनने भूत, वर्तमान, भविष्य ही काळाची आपण करीत असलेली विभागणी भ्रममूलक आहे, असे म्हटले आहे!) तेंव्हा नाडीग्रंथाचे भविष्य प्रत्यक्षात खरे ठरते की नाही हा प्रश्न बाजूला ठेवला तरी ते खरे ठरणे अशक्य आहे असे भौतशास्त्राच्या आधारे म्हणजे तात्विक भूमिकेवरून तरी कोणाला म्हणता येणार नाही !

फोटॉनवर आरूढ होणे कसे शक्य आहे असे येथे कोणी म्हणेल. वास्तविक फोटॉनवर आरूढ होणे म्हणजे 'प्रकाशमय' बनणे होय. आणि आत्मा प्रकाशमय असल्याचे आपली सारी उपनिषदे सांगतात, (उदा. मुंडक.उप. ३.१.२, श्वेता.उप. ३.८) गीताही सांगते. (८.९) अशारीतीने प्रकाशमय होणे म्हणजे आत्म्याचे स्वरूप जाणणे- आत्मज्ञानी होणे-होय. आणि आत्मज्ञानी पुरुषाला भूत-भविष्य जाणण्याची शक्ती (सर्वज्ञता) प्राप्त होते असे योगशास्त्र सांगते (पातंजल योग. विभूतिपाद, १६) ओक म्हणतात तसे हे नाडीग्रंथ लिहीणारे ऋषी प्रज्ञाचक्षू (आत्मज्ञानी) असतील तर अशी सर्वज्ञता त्यांना अशक्य नाही हे स्पष्ट आहे.

अर्थात् या प्रकारच्या ज्ञानाला 'आत्मज्ञान' किंवा 'प्रज्ञाचक्षु' न म्हणता योगशास्त्राच्या भाषेत 'सिद्धि' म्हणणे अधिक संयुक्तिक होईल.

अलीकडे वैश्विक पातळीवरचा कार्यकारणभाव (Universal causation) भासमान् किंवा भ्रामक ठरवणारा प्रायोगिक पुरावा भौतशास्त्रज्ञांना मिळाला आहे. याला 'ईपीआर पॅराडॉक्स' चा प्रयोग म्हणतात. (हा प्रयोग काँटम सिद्धांतील बेलच्या प्रमेयावर आधारलेला आहे.) या प्रयोगाने अध्यात्मशास्त्र, अतींद्रिय विज्ञान व भौतिक विज्ञान यांचा सुरेख संगम घडून आला असल्याचे दृश्य दिसत असून एक शास्त्र दुसऱ्या शास्त्राशी फार काळ कसे फटकून वागू (वा राहू) शकत नाही ही गोष्ट त्यामुळे पुरेशी स्पष्ट झाली आहे. अशा परिस्थितीत एखाद्या ज्ञानशाखेची जिज्ञासू वृत्तीने छाननी करून ती खोटी असल्याचे सिद्ध होण्यापूर्वीच तिची निंदा करणे, तिला अंधश्रद्धा ठरविणे हे कोणत्याही विज्ञानवृत्तीच्या माणसाला शोभत नाही हे स्पष्ट आहे.

अशारीतीने भौतशास्त्राचा प्राचीन ऋषींच्या सिद्धीला तात्विक विरोध नसला तरी या 'सिद्धी' खऱ्या आहेत. तो केवळ कल्पनाविलास नाही, हे कसे ठरवायचे ? अर्थात् प्रत्यक्ष या नाडीग्रंथांचा पडताळा पाहून त्यांचा स्वतःअनुभव घेऊन. प्रस्तुत लेखकाने नारळीकरांना हा पडताळा पाहण्याचा आग्रह करणारी पांच पत्रे लिहिली ती याचसाठी. आणि त्यांनी हात झटकल्यानंतर महाराष्ट्र 'अंनिस' ला हाच आग्रह अनेक पत्रे लिहून केला तोही याचसाठी. पण वर म्हटल्याप्रमाणे हे लोक सत्याला सामोरे जाण्याचा प्रसंग येतो तेंव्हा पलायनवादाचा अवलंब करीत असतात असा अनुभव आहे. आणि इतर क्षेत्रात लेखकाला आलेला हा अनुभव याहीक्षेत्रात यावा यात आश्चर्य नाही. कारण नारळीकरांप्रमाणेच हे लोकही बुद्धिवादी असल्याने त्यांच्या दृष्टीने त्यांची बुद्धी सांगते तेच सत्य ! प्रत्यक्ष प्रयोग किंवा अनुभव सांगतो ते नव्हे ! हा अर्थात् शुद्ध अवैज्ञानिकपणा आहे. पण याची त्यांना क्षिती नाही !

याचा अगदी ताजा पुरावा म्हणजे ओकांनी ८ डिसेंबर १९९८ रोजी आपण स्वतःनाडीग्रंथांचे आणखी परिशीलन करण्यासाठी १५ तारखेला मद्रासला जात असून मी (गळतगे यांनी) या विषयी 'अंनिस' ने पाळावयाची म्हणून ज्या अटी

सांगितल्या होत्या त्यांच्या पूर्ततेसाठी आपण स्वतःआंगठ्यांचे ठसे घेऊन यावे व तसे अगोदर फोनवर कळवावे असे दाभोळकरांना पत्राने कळवूनही त्यांनी काहीच उत्तर दिले नाही हा होय. त्यांनी मलाही फोनवर तसे कळवले व तत्काळ मी तटस्थ निरीक्षक म्हणून ओकांच्या बरोबर येण्याचे मान्य केले. ठरलेल्या दिवशी मी मद्रासला गेलो सुद्धा. कारण मला स्वतला या नाडीग्रंथांत कितपत तथ्य आहे हे स्वतःअनुभवाने तपासायचे होते.

प्रथम नाडीचे बंडल आंगठ्याच्या ठशाच्या साह्याने कसे हुडकतात याची माहिती मी करून घेतली, व मी स्वतच्या आंगठ्याचा ठसा १६ डिसेंबर रोजी दुपारी १२।। वाजता दिला. पहिल्या दोन बंडलात माझे नाव आले नाही. मात्र तिसऱ्या बंडलातच ते आले, ते जुन्या तमीळमध्ये होते. पुणे येथे वायुसेनेत नोकरी करीत असलेल्या श्री. रघुनाथन याना आम्ही सोबत नेलेल्या तमीळ जाणणाऱ्या माणसाकडून ते नाव वाचायला लावून माझेच असल्याची खात्री करून घेतली. जुने तमीळ अस्खलित वाचण्यासाठी अभ्यासाची आवश्यकता असली तरी आधुनिक सामान्य तमीळ जाणकार अक्षरे, नांवे ओळखू शकतो हे प्रत्यक्ष पट्टी वाचायला देऊन अनेकदा स्वतंत्रपणे खात्री करून घेतली आहे. माझ्या पट्टीत माझे, माझ्या वडिलांचे, माझ्या आईचे, माझ्या पत्नीचे अशी चार नांवे तर अचूकपणे आलीच, पण मी माझ्या वयाच्या कितव्या वर्षी हे नाडीग्रंथ पाहात आहे, कशासाठी पाहात आहे, कोणाबरोबर पाहात आहे हा तपशीलही त्यात आला ! म्हणजे शशिकात हे (विंग कमांडर ओकांचे) नावही त्याच पट्टीत होते, शिवाय विज्ञान संशोधन हा माझ्या विषयीचा तपशीलही त्यात होता. हा सर्व तपशील इतका बरोबर आलेला पाहून मी अवाक् झालो. माझे नांव कित्येकदा मराठी जाणणारे लोकसुद्धा चुकीचे वाचतात (उच्चारतात) असा अनुभव आहे. पण नाडीवाचकांने ते अगदी अचूक वाचल्याचे पाहून तर मी जास्तच आश्चर्यचकित झालो. (माझ्या नांवात पहिले अक्षर 'अ' व तिसरे अक्षर 'या' आहे काय एवढेच नाडीवाचकाने मला विचारले, मी 'हो' म्हणताच त्याने पटकन माझे पूर्ण नाव बरोबर वाचले. या पूर्वी त्याने माझ्या नावाविषयी कसलाही प्रश्न विचारला नव्हता.)

आता हा चमत्कार (हो, रूढ विज्ञानाच्या दृष्टीने हा चमत्कारच म्हटला

पाहिजे.) कसा घडला ? नाडीग्रंथांची भूर्जपत्रे अत्यंत जुनी होती. जुन्या पानांवर अलीकडे कुणी तरी लिहिले असावे असे म्हणावे तर माझी माहिती त्यांनी कशी व कुठुन मिळवली व केव्हा लिहिली हे महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. मला माझे पान हुडकण्यासाठी जे प्रश्न विचारले होते त्यातून इतका तपशील सादर करणे केवळ अशक्य असल्याची माझी खात्री होती. (आणि कोणीही हा अनुभव स्वतः घेऊन व असा एखादा प्रयोग करून खात्री करून घेऊ शकतो.) दुसरी गोष्ट, समजा पद्धतीने माहिती मिळवता आली, तरी ती त्या पट्टीत केंव्हा कोरली या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. ते देता येत नाही. कारण एका बंडलात नांव सापडले नाही, तर लगेच आपल्या समोर अल्पावधीत दुसरे बंडल आणून उघडले जाते, व त्यात ते कित्येकदा सापडते. (असे एक उदाहरण माझ्या समोरच घडले.) म्हणजे नांव कोरण्याइतकाही वेळ नसतो, पण समजा, पण काही वेळा लवकर नांव सापडले नाही आणि अगदी उशीराने - कचित दुसऱ्या दिवशी त्या नांवाचे बंडल सापडले, तर मध्यंतराच्या काळात ती माहिती कोरली गेली असावी असे म्हणावे, तर संबंधित व्यक्तीकडून 'काढून घेतलेल्या' माहितीव्यतिरिक्त इतरही अनेक प्रकारची बरोबर माहिती त्या पट्टीत आढळते ! उदा. जातकाच्या कुंडलीतील सर्व ग्रहस्थिती बरोबर आढळून येते ! आणि अशीच इतरही माहिती की जी त्या व्यक्तीकडून 'काढून' घेतली नव्हती, पण जी त्या व्यक्तीलाच लागू होते. ती कशी व कुठुन आली या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. बुद्धिवादाने या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

नाडीत भूतकाळ बरोबर येतो, पुढील भविष्य मात्र चुकते असा एक आक्षेप या नाडीग्रंथाविरुद्ध घेण्यात येतो. पण हा आक्षेप फोल आहे. ते दोन कारणासाठी, पहिले कारण सर्वच भविष्य चुकते हे खरे नाही हे मी पाहिलेल्या अगस्त्य नाडीकेंद्राच्या बाबतीत मी स्वतःतपासलेल्या काही उदाहरणांच्या आधारे म्हणू शकतो. किती टक्के चुकते व ते कां चुकते, यालाही माझ्या मते कारणे आहेत. पण त्याची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. (इतर केंद्रांचा मला अनुभव नाही.) दुसरे कारण, सर्वच नाडींची भविष्ये चुकतात व तीही पूर्णपणे, हे कोणी सर्वेक्षण करून सिद्ध केलेले नाही.

वरील सर्व प्रकारचे बुद्धिवाद्यांचे आक्षेप प्रत्यक्ष अनुभवाने कितपत टिकू

शकतात हे तपासून पाहाता येते. तसे न करता नी. र. वऱ्हाडपांड्यांसारखे काही बुद्धिवादी म्हणतात की हे नाडीग्रंथ विचार करण्याच्यासुद्धा लायकीचे नाहीत. कारण सकृदर्शनीच (Prima Facie) त्यांच्यात तथ्य नाही. केवळ वेड्याच्या इस्पितळातील माणूसच अशा ग्रंथांच्या पाठीमागे लागेल ! हे म्हणणे बुद्धिवादाला शोभणारे असले तरी वऱ्हाडपांड्यांचा बुद्धिवाद काही आगळाच आहे. हे कोणीही कबूल करील. इतका आगळा की त्याचा पुरस्कार करणाऱ्यांचे एक खास वेगळे इस्पितळ असले पाहिजे! नसेल तर उघडले पाहिजे. असे कोणीही म्हणेल !

पण नाडीचा स्वतःअनुभव घेऊन सुद्धा हा प्रकार बनावट म्हणणाऱ्यांना तुम्ही काय म्हणाल ? कोणा ओंकार पाटील नांवाच्या माणसाने असा प्रकार प्रत्यक्षात केला आहे ! ('किस्त्रीम' दिवाळी वार्षिक १९९६) आता या गृहस्थांनी नाडी ग्रंथाविरूद्ध लेख लिहिण्यापूर्वी त्याचा अनुभव घेतला असेल तर नाडीग्रंथात आपले नांव कोरून आलेले पाहून त्यांना आश्चर्य वाटले असले पाहिजे अशीच कोणीही अपेक्षा करील. पण अशी अपेक्षा करण्याचे कारण नाही! कारण त्याचे नांवच नाडीच्या पट्टीत कोरले गेलेले नाही ! मग ते पान त्यांने हे कसे ओळखले गेले? हाच तर चमत्कार आहे! आणि हा चमत्कार स्वतःया गृहस्थांनीच केलेला आहे! कारण पट्टीत आपले नांव कोरलेले आहे की नाही व हे तटस्थ तमीळ जाणणाऱ्याकडून त्यांनी स्वतःची खात्री करून घेतली की नाही याबद्दल ते 'ब्र' काढीत नाहीत ! याला हात चलाखीचा नव्हे लेखन चलाखीचा चमत्कार म्हणतात! आणि चमत्काराच्या वा जादूच्या कलेत हे लोक चांगले निष्णात आहेत ! अशा रीतीने मुख्य मुद्याला बगल देऊन वडिलांचे नांव चुकीचे आल्याबद्दल ते तक्रार करतात ! आता वडिलांचे नांव चुकीचे कोरून आले असेल तर नाडीवाचक ती पट्टी रद्द करून (दुसरी) पट्टी वाचायला घेईल. कारण त्याला संबंधित व्यक्तीची अचूक पट्टी काढायची असते व गिऱ्हाइकातर्फे कुठल्याही तक्रारीला जागा राहू देणे त्यांच्या धंद्याच्या दृष्टीनेही इष्ट नसते. आणि ही गोष्ट सदर गृहस्थांनाही चांगली माहित आहे! पण खरे हे तर सर्व नाटक वा हा सर्व जादूचा खेळ मराठी लोकांसाठी आहे! (याचा नाडीपट्ट्याच्या खरेपणाशी काही संबंध नाही!) आणि तोही 'अंनिस' चे पांच लाख रूपये, महाराष्ट्रातील तिचे अस्तित्व व अब्रू वाचवण्यासाठी ! मग त्यासाठी कुठलीही लबाडी केली तरी

त्यांच्या दृष्टीने कमीच आहे. (आपल्या कुंडलीतील ग्रहस्थिती बरोबर आली की नाही ही गोष्टही सदर लेखक सांगत नाही, गुप्त ठेवतो ! तोही या खेळाचा भाग म्हणूनच!) ग्रीकांची 'ट्रोजन हॉर्स' ची कला महाराष्ट्र 'अंनिस' ला अज्ञात आहे असे कोण म्हणेल ?

तात्पर्य जो पर्यंत डॉ. नारळीकर आणि 'अंनिस' चे स्वतःडॉ. दाभोळकर या नाडीग्रंथाची तपासणी करीत नाहीत तो पर्यंत हा खेळ लपंडावाचा खेळ म्हणून ओळखला जाईल. आणि नाडीग्रंथाविरूद्धच्या त्यांच्या आक्षेपांना शास्त्रीय दृष्ट्या शून्य किंमत राहील. अशा रीतीन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्वतच्र जाणून बुजून बुद्धिवादारूपी एका नव्या अंधश्रद्धेला बळी पडलेली असून तिचे समर्थन करण्यासाठी व सत्याला सामोरे जाण्याचे टाळण्यासाठी ती कश्या वाटेल त्या क्लुप्त्या लढवीत असते. याचे या ग्रंथाच्या वाचनाने वाचकांना चांगले प्रत्यंतर येईल. हे प्रत्यंतर आणून देणे हाच या ग्रंथाचा मुख्य उद्देश्य आहे. त्यात विंग कमांडर ओक कितपत यशस्वी झाले आहेत हे स्वतःवाचकांनी ठरवावयाचे आहे.

अद्वयानंद गळतगे भोज, ता. निपाणी, कर्नाटक - ५९१२६३

दूरध्वनी : ०८३३८-२०९७७ मो. क्रः ९९०२००२५८५






- अंनिस धाकटी व मोठी पाती यांचे आवडीचे विषय...
- पेपरवाले अशा बातम्यांचे काहूर उठवून समाजाची अवनिती व्हायला
- हिंदू समाज कसा जबाबदार आहे असे वारंवार दाखवायला तत्पर असतो.

# नाडी ग्रंथ भविष्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) यांची सद्यस्थिती काय आहे?

सध्या अंनिसचे अस्तित्व नाममात्र उरले आहे. अगस्त्य व इतर महर्षींच्या नाडी ग्रंथ भविष्याची केंद्रे पुण्यात १५ हून अधिक, महाराष्ट्रात ५० हून अधिक, तर संपूर्ण भारतात ३४० पेक्षा जास्त कार्यरत आहेत.

१९९४ ते १९९६ या काळात अंनिस अत्यंत सक्रिय होती. कै. नरेंद्र दाभोळकरांनी **दैनिक पुढारी**त लांबलचक लेख लिहून नाडी भविष्याचा विरोध धडाक्यात सुरू केला. त्यांनी नाडी भविष्याला थोतांड म्हणून हिणवले. त्याच काळात ज्योतिषशास्त्राचा मुद्दा नेहमीच चर्चेत राहिला, कारण ज्योतिषशास्त्राविषयी जोतिषांच्या कमकुवत भूमिकेमुळे अंनिसला विरोधासाठी सोईचा मुद्दा मिळत होता. नाडी भविष्य हे ज्योतिषशास्त्राचे एक छोटे अंग आहे, असे मानून दाभोळकरांनी नाडी ग्रंथ भविष्य केंद्रांना पहिल्याच टप्प्यात पराभूत करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

पद्मभूषण डॉ. जयंत नारळीकर यांनी नाडी भविष्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यास नकार दिला. त्याऐवजी त्यांनी अंनिसला मध्यस्थी करण्याचा सल्ला दिला. या प्रकरणाच्या अधिक चौकशीत अंनिसने चेन्नईजवळील तांबरम गावात भारतीय हवाई दलातील वरिष्ठ विंग कमांडर श्री. ओक यांच्याशी दीर्घ पत्रव्यवहार केला. या संवादादरम्यान, नाडी भविष्य हा अंदाज केवळ थोतांड नसून अधिक धोकादायक असल्याचे कै. दाभोळकरांना लक्षात आले. त्यांनी या विषयाचे नेतृत्व श्री. मा. श्री. रिसबुड व श्री. प्रकाश घाटपांडे यांच्याकडे सोपवले.

या विषयावर नागपूरचे प्रसिद्ध विवेकवादी डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यांनीही भूमिका घेतली, परंतु त्यांची भूमिका आडमुठी होती. त्यानंतर अंनिसचा उत्साह ओसरू लागला. ज्योतिषाचार्य अतुल छाजेड यांनी अंनिसला लाखो रुपयांचे खुले प्रतिआव्हान दिल्याने आव्हानाच्या मार्गातआणखी अडसर आला. श्री. मा. श्री. रिसबुड यांच्या निधनानंतर श्रीकांत शहा, ओंकार पाटील आणि इतर काही प्रमुख सदस्यांनी सहभाग सोडल्यानंतर अंनिसची ताकद कमी झाली. एकंदरीत समाजवादी विचारसरणी मागे पडत गेली. पुण्यातील एक नाडी केंद्र चालक श्री ईश्वरन यांनी रिसबुड, बी. प्रेमानंद यांच्या आक्षेपांना सडेतोड उत्तर दिले आणि अंनिसचे नाडी भविष्यावरील आंदोलन क्षीण झाले.

या सर्व घडामोडींमध्ये, प्राचार्य अद्वयानंद गळतगे यांची भूमिका महत्त्वाची ठरली. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून, ६ ऑगस्ट २०२३ रोजी पुण्यातील मराठी परिषद सभागृहात त्यांना 'ज्ञानतपस्वी' हा सन्मान आणि जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. ही घटना त्यांच्या ९३व्या वाढदिवसानिमित्त साजरी करण्यात आली.

नाडी ग्रंथ भविष्य आणि अंनिस यांच्यातील संघर्षाचा हा इतिहास विचार करण्याजोगा आहे, जो अंनिसच्या बदलत्या प्रवृत्ती आणि मर्यादांवर प्रकाश टाकतो.